अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 21 मे 2026 | वर्ष 11 वे | अंक 41 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# नीट पेपरफुटी प्रकरण : विदर्भात सीबीआयचा मोठा दणका

## ब्रम्हपुरीसह नागपूर येथील ३ परीक्षार्थींच्या घरांवर छापे

ब्रह्मपुरी/का.प्र.

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या 'नीट' (NEET) परीक्षा पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे आता विदर्भापर्यंत पोहोचले आहेत. या प्रकरणाचा सखोल तपास करणाऱ्या केंद्रीय अन्वेषण विभागाने (CBI) विदर्भात मोठी कारवाई केली. सीबीआयच्या पथकाने नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी येथे एकाच वेळी छापे टाकत तीन परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या घरांची कसून झाडाझडती (सर्च ऑपरेशन) घेतली. या धडक कारवाईमुळे शिक्षण क्षेत्रात आणि पालकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची बातमी एका खाजगी वृत्तवाहिनीने प्रकाशित केल्यानंतर मोठी खळबळ उडाली असून ब्रह्मपुरी मध्ये तो परीक्षार्थी कोण याचा नागरिक शोध घेता आहेत.




एका खाजगी वृत्तवाहिनीने प्रकाशित केलेल्या विश्वासनीय माहितीनुसार, नीट पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाची चक्रे वेगाने फिरवत सीबीआयच्या दिल्लीतील मुख्य पथकाने थेट नागपूर गाठले. स्थानिक नागपूर सीबीआय टीमला सोबत घेऊन या संयुक्त पथकाने आज पहाटेपासूनच विदर्भातील निश्चित केलेल्या ठिकाणांवर शोधमोहीम सुरू केली. संशयित विद्यार्थ्यांच्या थेट घरी पोहोचून अधिकाऱ्यांनी झाडाझडती घेण्यास सुरुवात केली.

सीबीआयच्या या कारवाईमध्ये विदर्भातील तीन विद्यार्थी रडारवर आले आहेत. यात येथील दोन संशयित परीक्षार्थी विद्यार्थिनींच्या घरांवर सीबीआयने छापे टाकले. चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी येथील एका परीक्षार्थी विद्यार्थ्याच्या घरी सीबीआयच्या पथकाने धडक देत तपास केला. या तिन्ही विद्यार्थ्यांच्या घरी इलेक्ट्रॉनिक पुरावे, परीक्षा संबंधित कागदपत्रे आणि इतर संशयास्पद बाबींची कसून चौकशी करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांचीही चौकशी केल्याची माहिती समोर येत आहे.

नीट परीक्षेतील गैरव्यवहार आणि पेपरफुटी प्रकरणामुळे आधीच देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले आहे. अशातच आता थेट विद्यार्थ्यांच्या घरांपर्यंत सीबीआयचे छापे पडल्याने या प्रकरणाचे गांभीर्य अधिकच वाढले आहे. या झाडाझडतीदरम्यान सीबीआयच्या हाती नेमके कोणते महत्त्वाचे धागेदोरे लागले आहेत? आणि या कारवाईतून पेपरफुटीच्या मुख्य सुत्रधारांपर्यंत पोहोचण्यात यश येणार का? याकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. या कारवाईमुळे विदर्भातील पेपरफुटीचे हे रॅकेट किती खोलवर पसरले आहे, याचा पर्दाफाश लवकरच होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# डायल ११२ या खेळखंडोबा: अतिउत्साही नागरिकांमुळे खाकी वर्दी त्रस्त

## दोनच वाहने, रेल्वे फाटकाची समस्या व जंगलव्याप्त गावांचे आव्हान, विनाकारण कॉल करणाऱ्यांवर ताशेरे

ब्रम्हपुरी/का.प्र.

आणीबाणीच्या काळात नागरिकांना तात्काळ पोलीस मदत मिळावी यासाठी शासनाने 'डायल ११२' ही हायटेक सेवा सुरू केली. मात्र, ब्रम्हपुरी तालुका आणि शहरात या सुविधेचा गैरवापर होत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. किरकोळ वाद, दारू पिऊन होणारा धिंगाणा अशा शुल्लक कारणांसाठीही नागरिक थेट 'डायल ११२' वर कॉल करून पोलिसांना घटनास्थळी बोलवत आहेत. नागरिकांच्या या अतिउत्साहामुळे आणि विनाकारण दिल्या जाणाऱ्या त्रासामुळे ब्रम्हपुरी पोलिसांवर कामाचा प्रचंड ताण येत असून, मूळ गुन्ह्यांच्या तपासात मोठे अडथळे निर्माण होत आहेत.

'डायल ११२' ही यंत्रणा थेट राज्याच्या मध्यवर्ती नियंत्रण कक्षाशी (Emergency Response Center) जोडलेली असून जीपीएस तंत्रज्ञानावर काम करते. गंभीर गुन्हे, अपघात, महिला व बालकांवरील अत्याचार, किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास शहरात १० ते १५ मिनिटांत तर ग्रामीण भागात १५ ते ३० मिनिटांत मदत पोहोचवणे हे या यंत्रणेचे मुख्य काम आहे. परंतु, ब्रम्हपुरी तालुक्यातील अनेक गावांमध्ये



याच्या अगदी उलट घडताना दिसत आहे. केवळ रात्री-अपरात्री दारू पिऊन धिंगाणा घालणे, घरातील किरकोळ कौटुंबिक वाद किंवा अगदी शुल्लक कारणांसाठीही पोलीस मदतीचा गैरवापर केला जात आहे. विशेष म्हणजे, भौगोलिक परिस्थितीचा विचार न करता, पोलीस पोहोचण्यास थोडा जरी उशीर झाला, तरी नागरिक नियंत्रण कक्षात वारंवार कॉल करून तक्रारींचा पाऊस पाडतात.

एकीकडे विनाकारण येणाऱ्या कॉल्सची संख्या वाढत असताना, दुसरीकडे ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यातील संसाधनांची व कर्मचाऱ्यांची कमतरता ही मोठी डोकेदुखी ठरत आहे. पोलीस ठाण्यात लोकसंख्येला पूरक इतकी पोलिस कर्मचाऱ्यांची संख्या नसल्यामुळे अडचण निर्माण होत आहे. सद्यस्थितीत पोलीस ठाण्यात दळणवळणासाठी केवळ दोनच शासकीय वाहने उपलब्ध आहेत. अशा मर्यादित पोलिस कर्मचारी व संसाधनांमध्ये संपूर्ण तालुक्याचा भार सांभाळताना पोलिसांची मोठी दमछाक होत आहे. तालुक्यामध्ये हळदा, मुडझा, एकारा, आवळगाव, रामपुरी यांसारखी दुर्गम आणि जंगलव्याप्त गावे आहेत. या भागांमध्ये एखादी खरी आणीबाणीची घटना घडल्यास, मर्यादित वाहनांमुळे ठरवून दिलेल्या वेळेत पोहोचणे पोलिसांना अशक्य होते. त्यातच खोट्या तक्रारींमुळे वाहने व्यस्त राहिल्यास खऱ्या गरजूंपर्यंत मदत पोहोचण्यास उशीर होतो. ब्रम्हपुरी शहरांतर्गत एखाद्या वॉर्डात घटना घडल्यास पोलिसांना अनेकदा बंद रेल्वे फाटकाचा सामना करावा लागतो. यामुळे वाहने खोळंबून राहतात आणि वेळेवर पोहोचण्यात अडचणी येतात.

नागरिकांच्या या बेजबाबदार वर्तनामुळे ब्रम्हपुरी पोलिसांना नियमित गुन्हेगारी प्रकरणांचा तपास करणे, गस्त घालणे आणि इतर प्रशासकीय कामे करणे कठीण झाले आहे. आपत्कालीन सेवा ही गंमत नसून, ती कोणाचा तरी जीव वाचवण्यासाठी असू शकते, याचे भान नागरिकांनी ठेवणे गरजेचे आहे. 'डायल ११२' वर येणाऱ्या प्रत्येक कॉलची आणि संभाषणाची माहिती थेट रेकॉर्ड होते. त्यामुळे जुने जमिनीचे वाद, किंवा सामान्य तक्रारींसाठी पोलीस स्टेशनमध्ये जावे. विनाकारण कॉल करून पोलिसांना त्रास देणाऱ्या आणि शासकीय यंत्रणेचा वेळ वाया घालवणाऱ्या अशा उपद्रवी नागरिकांवर आता कठोर कायदेशीर ताशेरे ओढण्याची वेळ आली आहे.



## संपादकीय...

# कर्जमाफीचे गाजर!

गेल्या दशकभरात केंद्र सरकारने 'अमृतकाल', 'विकसित भारत', 'जगातील सर्वात वेगवान अर्थव्यवस्था' अशा घोषणांद्वारे आशावादाचे वातावरण निर्माण केले. परंतु या घोषणांइतक्याच मोठ्या अपेक्षा सामान्य माणसाच्या मनात निर्माण झाल्या. रोजगारनिर्मिती, उत्पन्नवाढ, स्वस्त इंधन, मजबूत रुपया आणि स्थिर बाजारपेठ यांची स्वप्ने दाखवण्यात आली. प्रत्यक्षात मात्र बेरोजगारीचा प्रश्न कायम राहिला. महागाईने मध्यमवर्गाचे बजेट कोलमडले. ग्रामीण अर्थव्यवस्था अजूनही पूर्णपणे सावरलेली नाही. अशा स्थितीत जागतिक संकटांचा धक्का भारताला अधिक तीव्रतेने बसत आहे.

भारताच्या आर्थिक अडचणींचा केंद्रबिंदू सध्या तेलदर आहेत. भारत हा मोठ्या प्रमाणावर तेल आयात करणारा देश. त्यामुळे पश्चिम आशियातील प्रत्येक संघर्ष भारतीय अर्थव्यवस्थेच्या नसांवर परिणाम करतो. इराण-इस्राईल युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किंमती वाढत आहेत. परिणामी पेट्रोल, डिझेल, गॅस, वाहतूक, उत्पादन खर्च आणि अखेरीस जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढणार हे जवळपास निश्चित आहे. सरकारने नुकतीच इंधनावरील करवाढ केली. तिचा परिणाम बाजारपेठेवर दिसू लागला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात तेल स्वस्त असताना ग्राहकांना त्याचा पुरेसा लाभ दिला गेला नाही, ही टीकाही रास्तच ठरते. त्या काळात सरकारने करवाढीच्या माध्यमातून महसूल वाढवला. आता मात्र वाढत्या तेलदरांचा बोजा ग्राहकांवर टाकण्याची वेळ आली आहे.

या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी इंधन बचत, घरून काम, सोने खरेदी कमी करणे, परदेश प्रवास टाळणे अशा सूचना केल्या. त्या व्यावहारिक असल्या तरी त्यातून जनतेत असुरक्षिततेची भावना अधिक बळावली. देश आर्थिक संकटाच्या उंबरठ्यावर उभा आहे का, असा प्रश्न निर्माण झाला. सरकारला नंतर स्पष्टीकरणे द्यावी लागली, यावरूनच परिस्थिती किती संवेदनशील आहे हे स्पष्ट होते. रुपयाची घसरण ही आणखी एक गंभीर बाब आहे. डॉलरच्या तुलनेत रुपया सातत्याने कमकुवत होत आहे. त्याचा थेट परिणाम आयातीवर होतो. परदेशी गुंतवणूकदार भारतीय बाजारातून पैसे काढून घेत असल्याने दबाव वाढत आहे. शेअर बाजारातील अस्थिरता, निर्यातीतली घट आणि जागतिक व्यापारातील मंदी यामुळे अर्थव्यवस्थेवरील ताण वाढत चालला आहे. उदय कोटक, रघुराम राजन, डी. सुब्बाराव यांसारख्या अनुभवी अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केलेल्या चिंता केवळ राजकीय स्वरूपाच्या नाहीत; त्या व्यवस्थात्मक धोक्यांकडे निर्देश करणाऱ्या आहेत.

याहून चिंताजनक बाब म्हणजे भारताची परराष्ट्र आणि आर्थिक धोरणे आता परस्परांशी अधिक घट्ट जोडली गेली आहेत. अमेरिकेचे निर्बंध, रशियन तेल आयात, चीनशी तणाव, पश्चिम आशियातील युद्ध आणि जागतिक व्यापार करार यांचा परिणाम थेट भारतीय अर्थव्यवस्थेवर होत आहे. 'बहुध्रुवीय जगात भारत स्वतंत्र भूमिका घेत आहे' असा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात अनेक आघाड्यांवर भारताची कोंडी होत असल्याचे चित्र आहे. अमेरिकेशी संबंध टिकवायचे, रशियाशी ऊर्जा व्यवहारही सुरू ठेवायचे आणि चीनशी स्पर्धादेखील करायची, या तिहेरी समीकरणात भारत अडकताना दिसतो. अर्थात, या परिस्थितीचा सर्व दोष केवळ केंद्र सरकारवर टाकून चालणार नाही. जागतिक अर्थव्यवस्था स्वतःच मोठ्या संक्रमणातून जात आहे. कोविडनंतरची आर्थिक पुनर्बांधणी, रशिया-युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील संघर्ष, जागतिक पुरवठा साखळीतील अडथळे आणि वाढती संरक्षण खर्चाची शर्यत या साऱ्यांचा परिणाम प्रत्येक देशावर होत आहे. मात्र प्रश्न असा आहे की, भारताने गेल्या दशकातील तुलनेने अनुकूल काळाचा कितपत दूरदृष्टीने उपयोग केला?

आज देशासमोर खरी गरज आहे ती वास्तववादी आर्थिक धोरणांची. घोषणांपेक्षा रोजगारनिर्मिती, उद्योगांना चालना, कृषी क्षेत्राचे पुनरुज्जीवन, आयात-निर्भरता कमी करणे आणि सामान्य माणसाच्या खिशाला दिलासा देणे हे अधिक महत्त्वाचे आहे. जनतेकडून 'त्याग' मागण्यापूर्वी शासनाने आपल्या आर्थिक प्राधान्यक्रमांचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे.

# ने.हि. महाविद्यालयातील गुणवंतांचा जंगी सत्कार

ब्रम्हपुरी/का.प्र.

'यशाचा मार्ग परिश्रमातून जातो आणि जेव्हा त्या कष्टांना यशाची साथ मिळते, तेव्हा



त्याचा आनंद गगनात मावेनासा होतो.' असाच एक सुवर्णक्षण नुकताच ब्रम्हपुरी येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाच्या प्रांगणात अनुभवला गेला. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावी परीक्षेत महाविद्यालयाने विज्ञान, वाणिज्य, कला आणि एमसीव्हीसी (MCVC) या चारही शाखांत अभूतपूर्व यश संपादन केल्याबद्दल गुणवंत विद्यार्थ्यांचा एका भव्य समारंभात गौरव करण्यात आला.

महाविद्यालयाच्या निकालाने पुन्हा एकदा गुणवत्तेची परंपरा सिद्ध केली आहे. शाखावार निकाल आणि अव्वल विद्यार्थी यात वाणिज्य शाखा (निकाल ९८.८२%): भक्ती संदीप राठी हिने ९३% गुणांसह तालुक्यातून प्रथम येण्याचा मान पटकावला. विज्ञान शाखा (निकाल ९९.३४%): साहिल बबन कोलते याने ९१.५०% गुणांसह शाखेतून अग्रस्थान पटकावले. कला शाखा: नेहा रमेश जेंगठे हिने ८६% गुणांसह यश संपादन केले. MCVC विभाग: रोहित डी. चांडीकर ७३.३३% गुणांसह शाखेतून आघाडीवर राहिला.

या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले ते ने. हि. शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया यांचे मार्गदर्शन. विद्यार्थ्यांना उद्देशून बोलताना ते म्हणाले की, 'हे यश केवळ आकड्यांचे नसून ते तुमच्या रात्रींच्या जागरणांचे, डोळ्यांतील स्वप्नांचे आणि शिक्षकांच्या निःस्वार्थ मार्गदर्शनाचे प्रतिबिंब आहे. आयुष्याच्या पुढील प्रवासातही हीच जिद्द आणि उमेद कायम ठेवा.' कार्यकारी प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रा. विनोद नरड यांच्या मार्गदर्शक उपस्थितीत हा सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राहुल के. मोहुर्ले यांनी केले. त्यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला. ज्योती के. दुफारे यांनी आपल्या प्रसन्न शैलीत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. तर परिमल मेघरे यांनी सर्वांचे आभार मानले.

आपल्या पाल्यांचा गौरव होताना पाहून उपस्थित पालकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. 'आमच्या स्वप्नांना आज खऱ्या अर्थाने पुरस्कार मिळाला आहे,' अशी भावना पालकांनी व्यक्त केली. संस्थेच्या अध्यक्षा स्नेहलताताई भैया यांनी दूरध्वनीवरून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे हृदयपूर्वक अभिनंदन केले. गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्त आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असलेल्या नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाने या निकालाद्वारे ब्रम्हपुरीच्या आकाशात यशाचा झेंडा पुन्हा एकदा अभिमानाने फडकवला आहे. या यशामुळे संपूर्ण शहरात महाविद्यालयाच्या शैक्षणिक कार्याची प्रशंसा होत आहे.

# छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला येथे दि.१४ मे २०२६ ला छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन दुधे आणि प्रा.सुहास साखरकर यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण व फुले अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

या वेळेस महाविद्यालयाचे रा.से.यो.अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन, आई.क्यू.ए.सी. प्रमुख प्रा.अनुप बारसागडे, डीबाटू परीक्षा प्रमुख प्रा.छगन डोईजड, गोंडवाना विद्यापीठ परीक्षा प्रमुख प्रा.पृथ्वीराज मेश्राम, प्रा.पूजा घुटके, प्रा.सविता शेंडे, प्रा.विजया सोनवणे, प्रा.चेतन चौधरी व प्रा. प्रसंजित लांडगे तसेच शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य डॉ.श्री.सचिन दुधे यांनी सर्वांना छत्रपती संभाजी महाराज यांच्या विषयी संबोधित केले.

या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन व स्वयंसेवक तसेच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत महाविद्यालय परिसराची स्वच्छता केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.श्रीकांत महाजन यांनी केले.

## विनोदिनी

पप्पू के घर के दरवाज़े के ताले की चाबी खो गई... बहुत धुंधनें पर भी नहीं मिली... तो उसने दरवाजाही निकाला और कंधे पे रख के बाज़ार मे ठीक करने गया...

एक आदमी ने पूछा : ओ भाई, क्या दरवाज़ा बेचना है ???

पप्पू : नही, ताला खुलवाना है, चाबी गुम हो गई है...

जोक अभी आगे है :

हँसो मत !!!

आदमी पप्पू से : अगर घर मे चोर घुस गये तो ???

पप्पू : अंदर कैसे जाएगा ??? दरवाज़ा तो मेरे पास है..!! और चाबी भी नहीं है...!!!

# आगामी जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना द्या; अन्यथा जनगणनेवर बहिष्कार!

## अखिल कुणबी समाज मंडळ ब्रम्हपुरीद्वारे प्रांत अधिकाऱ्यांना निवेदन



ब्रह्मपुरी/का.प्र.

आगामी २०२६-२७ च्या राष्ट्रीय जनगणनेच्या प्रपत्रात इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गासाठी स्वतंत्र रकाना (कॉलम) समाविष्ट करण्यात यावा, या न्याय्य मागणीसाठी 'अखिल कुणबी समाज मंडळ, ब्रह्मपुरी'च्या वतीने प्रांत अधिकाऱ्यांना नुकतेच एक सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. शासनाने या मागणीवर तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आगामी राष्ट्रीय जनगणनेवर पूर्णपणे बहिष्कार टाकण्यात येईल, असा आक्रमक इशारा मंडळाने याप्रसंगी दिला आहे.

सध्याच्या जनगणनेच्या आराखड्यानुसार अनुसूचित जाती (एससी ) आणि अनुसूचित जमाती (एसटी) यांच्यासाठी प्रपत्रात स्वतंत्र रकाने उपलब्ध आहेत. मात्र, देशात आणि राज्यात सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या ओबीसी प्रवर्गाची स्वतंत्र नोंद न करता, त्यांची गणना केवळ 'इतर' या श्रेणीत केली जाते. या त्रुटीयुक्त पद्धतीमुळे ओबीसींची नेमकी लोकसंख्या कधीच स्पष्ट होत नाही. हा वर्षानुवर्षे चालत आलेला अन्याय दूर करून आगामी जनगणनेत ओबीसींसाठी हक्काचा स्वतंत्र रकाना द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

ओबीसी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक धोरणे आखणे गरजेचे आहे. लोकसंख्येच्या योग्य प्रमाणात शासकीय योजना आणि आरक्षणाचा थेट लाभ मिळवून देण्यासाठी अचूक आकडेवारी असणे हे मुख्य सूत्र आहे. मात्र, ठोस आणि अधिकृत आकडेवारी नसल्याने ओबीसी समाजाच्या कायदेशीर हक्कांवर गदा येत असल्याचे अखिल कुणबी समाज ब्रह्मपुरी मंडळाचे म्हणणे आहे. २०२६-२७ ची राष्ट्रीय जनगणना ही पूर्णपणे डिजिटल स्वरूपात होणार असल्याने, प्रपत्रात हा बदल करणे तांत्रिकदृष्ट्या सहज शक्य आहे, याकडेही शिष्टमंडळाने प्रशासनाचे लक्ष वेधले.

ब्रह्मपुरी प्रांत अधिकाऱ्यांमार्फत केंद्र व राज्य सरकारला हे निवेदन पाठवण्यात आले आहे. ओबीसींच्या न्याय्य हक्कांसाठी आता संपूर्ण समाज एकवटला असून, शासनाने या मागणीची तातडीने व गांभीर्याने दखल न घेतल्यास भविष्यात केवळ तीव्र लोकआंदोलनच छेडले जाणार नाही, तर संपूर्ण कुणबी व ओबीसी समाज बांधव राष्ट्रीय जनगणनेच्या कामावर पूर्णपणे बहिष्कार टाकतील, असा स्पष्ट इशारा अखिल कुणबी समाज मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाला दिला आहे. निवेदन सादर करताना मंडळाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्याच योजनांना अल्प मुदत कां?

## रब्बी धान विक्रीसाठी मुदतवाढीची मागणी

ब्रह्मपुरी/का.प्र.

शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनस्तरावर अनेक महत्त्वाकांक्षी उपक्रम आणि योजना राबविल्या जातात. मात्र, या योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रशासनाकडून केवळ १० ते १५ दिवसांचीच तोकडी मुदत दिली जाते. परिणामी, आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव करताना शेतकऱ्यांची मोठी तारांबळ उडते. दरवर्षी उद्भवणाऱ्या या परिस्थितीमुळे 'शेतकऱ्यांच्याच योजनांना एवढी अल्प मुदत का?' असा संतप्त सवाल आता शेतकरी वर्गातून उपस्थित केला जात आहे. सध्या रब्बी हंगामातील धान विक्रीसाठी ऑनलाइन नोंदणी करण्याची मुदत १५ मे रोजी संपली आहे. मात्र, अनेक शेतकरी अद्यापही शेतीकामात व्यस्त असल्याने त्यांची नोंदणी होऊ शकलेली नाही. त्यामुळे या मुदतीत तातडीने वाढ करण्यात यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

दरवर्षी खरीप हंगामात धानाची नोंदणी, विक्री आणि पिकांची ऑनलाइन 'ई-पीक पाहणी' करण्यासाठी प्रशासनाकडून सुरुवातीला १५ दिवसांचीच मुदत दिली जाते. पुढे ही मुदत ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यापर्यंत टप्प्याटप्प्याने वाढवली जाते. त्यानंतर धान खरेदी केंद्र सुरू झाल्यावरही पुन्हा १५-१५ दिवसांचीच मुदतवाढ देण्याचा खेळ खंडोबा सुरू राहतो. या संपूर्ण प्रक्रियेत शेतकऱ्यांना वेळेत नोंदणी करता येत नाही. मग, मुदत संपत आल्यावर एखादे लोकप्रतिनिधी शासनाकडे पाठपुरावा करतात आणि मुदतवाढ मिळाल्यानंतर 'आम्हीच मुदतवाढ आणली' असे सांगत श्रेयाचे राजकारण केले जाते, असा आरोपही आता शेतकरी करत आहेत.

शासनस्तरावरून दरवर्षी खरीप व रब्बी हंगामातील पिकांसाठी हमीभाव जाहीर केला जातो आणि त्यानुसार शासकीय केंद्रांवरून खरेदी केली जाते. ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहिल्यास, दरवर्षी खरीप हंगामातील धान खरेदी जवळपास मार्च आणि एप्रिल महिन्यापर्यंत सुरू असते. जर खरेदी जास्त काळ चालणार आहे, तर मग सुरुवातीलाच केवळ १५ दिवसांची मुदत देऊन शेतकऱ्यांना अडचणीत का टाकले जाते? प्रशासनाला दर १५ दिवसांनी मुदतवाढ देण्याची नामुष्की का पत्करावी लागते? असा थेट प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. सध्याची परिस्थिती पाहिल्यास, रब्बी हंगामातील धानाची विक्री करण्यासाठी ऑनलाइन नोंदणीची अंतिम मुदत १५ मे पर्यंत देण्यात आली होती. मात्र, सध्या ग्रामीण भागात शेतकरी पीक काढणीच्या, मळणीच्या आणि उन्हाळी शेतीकामात प्रचंड व्यस्त आहेत.' आम्ही शेतात राबायचे की कागदपत्रे घेऊन ऑनलाइन केंद्रांवर चकरा मारायच्या? बँकेच्या फेऱ्या, सातबारा आणि इतर कागदपत्रे गोळा करेपर्यंत १५ दिवस कसे निघून जातात, हे समजतच नाही. यात अनेक अल्पभूधारक शेतकरी नोंदणीपासून वंचित राहिले आहेत.' अशी शेतकऱ्यांची व्यथा आहे.

१५ मे ची मुदत संपल्यामुळे ज्या शेतकऱ्यांची ऑनलाइन नोंदणी झालेली नाही, त्यांना आपला हक्काचा माल शासकीय हमीभाव केंद्रावर विकता येणार नाही. पर्यायाने त्यांना व्यापाऱ्यांना कमी दरात धान विकावे लागण्याची भीती निर्माण झाली आहे. हा आर्थिक फटका टाळण्यासाठी शासनस्तरावरून रब्बीतील धानविक्रीच्या ऑनलाइन नोंदणीला तातडीने मुदतवाढ देण्यात यावी, अशी आग्रही मागणी संपूर्ण धान उत्पादक पट्ट्यातून केली जात आहे. आता यावर शासन काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**जल है तो कल है...**

# छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्य

## वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील शिव छत्रपती फाउंडेशनच्या वतीने स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची ३६९वी जयंती ब्रम्हपुरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाच्या सभागृहात साजरी करण्यात आली. जयंती निमित्ताने छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर आधारित वक्तृत्व स्पर्धा व वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.




यावेळी मंचावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ देवेश कांबळे हे होते. तर उद्घाटक म्हणून नगराध्यक्ष योगेश मिसार हे होते. तर सह-उद्घाटक म्हणून ओबीसी युवा अधिकार मंचचे उमेशजी कोराम हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. संजय मगर तर प्रमुख अतिथी म्हणून ब्रम्हपुरी पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका रिमा कांबळे, ओबीसी विचारवंत भाऊराव राऊत, पत्रकार राहुल मैंद, संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष सुरज तलमले, सामाजिक कार्यकर्ते गिरीश बुराडे हे होते. यावेळी बोलतांना मान्यवरांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या पराक्रम, विद्वत्ता आणि सामाजिक दृष्टिकोनावर सखोल मार्गदर्शन केले.

वादविवाद स्पर्धेच्या सर्व रोख बक्षीसांचे प्रायोजक विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते आमदार विजय वडेट्टीवार हे होते. तर वक्तृत्व स्पर्धेतील बक्षीसांच्या रोख रक्कमेचे प्रायोजक छत्रपती फाउंडेशन हे होते. वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक विधी बनसोड, द्वितीय क्रमांक सुशांत ठाकरे आणि तृतीय क्रमांक अनुज नागदेवते यांनी पटकावला. तसेच वाद-विवाद स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक समीक्षा पंडित, द्वितीय क्रमांक तेजस्विनी घरडे आणि तृतीय क्रमांक योगेश सिडम यांनी मिळविला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोंटु पिलारे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदित्य बोरकर यांनी तर आभार तेजस दोनडकर यांनी केले.

# ब्रम्हपुरीत भरवस्तीत चालणाऱ्या वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश; दोघांवर गुन्हा

ब्रम्हपुरी/का.प्र.

शहरातील नामांकित आणि रहिवासी परिसर असलेल्या फाशी चौक भागात सुरू असलेल्या एका देहव्यापाराच्या अड्डयावर ब्रम्हपुरी पोलिसांनी गुरुवारी (१४ मे) संध्याकाळी धाडसी छापा टाकला. पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनात गुन्हे शोध पथकाने (DB) रचलेल्या बनावट ग्राहकाच्या जाळ्यात मुख्य महिला दलाल रंगेहात अडकली. या कारवाईत पोलिसांनी रोख रकमेसह मोबाईल व इतर साहित्य जप्त केले असून, दोन आरोपींविरुद्ध अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

१४ मे रोजी ब्रम्हपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांना गोपनीय बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, फाशी चौक परिसरातील भोयर यांच्या घरात छुप्या पद्धतीने वेश्याव्यवसाय चालवला जात आहे. सार्वजनिक ठिकाण, शाळा आणि निवासी वस्तीजवळ सुरू असलेल्या या प्रकाराची गंभीर दखल घेत पोलिसांनी तात्काळ दोन महिला समाजसेविकांना पंच म्हणून पाचारण केले आणि छाप्याची आखणी केली. गुन्हे शोध पथकातील एका पोलीस अंमलदाराला साध्या गणवेशात घटनास्थळावर पाळत ठेवण्यासाठी आधीच रवाना करण्यात आले. त्यानंतर बनावट ग्राहक (Dummy Customer) बनवून तयार करण्यात आले. पोलिसांमार्फत त्याच्याकडे ५०० रुपयांच्या चार चिन्हांकित नोटा सोपवण्यात आल्या. ठरलेल्या संकेतानुसार, बनावट ग्राहकाने घरात प्रवेश करून व्यवहार निश्चित केला आणि पोलिसांना व्हॉट्सॲपवर 'OK' असा संदेश पाठवला. संदेश मिळताच पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले, सहायक पोलीस निरीक्षक मनोज खडसे, सपोनि शितल खोब्रागडे आणि अंमलदारांच्या पथकाने घरात प्रवेश केला. यावेळी तिथे घराची मालकीण आणि एका खोलीत बनावट ग्राहक व एक महिला आढळून आले. महिला अंमलदारांमार्फत घेतलेल्या अंगझडतीत मुख्य दलाल महिलेकडून पोलिसांनी बनावट ग्राहकाने दिलेल्या चिन्हांकित नोटा आणि १०,००० रुपये किमतीचा विवो कंपनीचा मोबाईल जप्त केला. तसेच खोलीतून इतर रोख रक्कम, रिअलमी कंपनीचा मोबाईल आणि आक्षेपार्ह साहित्य असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्राथमिक चौकशीत समोर आले आहे की, मुख्य आरोपी महिला व तिचा पती हे दोघे मिळून बाहेरील भागातून येणाऱ्या गरजू महिलांच्या आर्थिक अडचणीचा गैरफायदा घ्यायचे. ग्राहकांकडून १,००० रुपये वसूल करून, त्यातील अर्धी रक्कम स्वत: ठेवायचे आणि अर्धी रक्कम संबंधित पीडित महिलेला द्यायचे, अशी कबुली दलाल महिलेने पंचांसमक्ष दिली. हा संपूर्ण अनैतिक प्रकार सम्राट अशोक चौक आणि सावित्रीबाई फुले शाळेसारख्या सार्वजनिक व शैक्षणिक ठिकाणापासून अवघ्या २०० मीटरच्या आत सुरू होता. याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक मनोज खडसे यांच्या तक्रारीवरून आरोपी प्रवीण भोयर याची पत्नी (वय ३४) आणि आरोपी प्रवीण अनिल भोयर (वय ३६, दोघे रा. फाशी चौक, ब्रम्हपुरी) यांच्याविरुद्ध अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ (PITA) च्या कलम ३, ४, ५ आणि ७ अन्वये ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ब्रम्हपुरी पोलिसांनी दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले असून प्रकरणाचा पुढील तपास ब्रम्हपुरी पोलीस करीत आहेत.

## सीबीएसई १२ वीच्या परिक्षेत एलएमबी स्कुलचे यश

ब्रम्हपुरी/का.प्र.

शिक्षणाचा दर्जा उंचावत यशाची नवनवीन शिखरे सर करणाऱ्या एन. एच. एज्युकेशन सोसायटी संचालीत एल. एम. बी. पब्लिक स्कुल, ब्रम्हपुरी या शाळेने दरवर्षीप्रमाणे या वर्षीही सी.बी.एस.ई. १२ वी परीक्षेत आपला दबदबा कायम राखला आहे.


ओजस नाकाडे
९१.४० टक्के


हरीश दडमल
८४.४० टक्के


यश सहारे
८०.२० टक्के


श्रेया वासनिक
७९.०० टक्के


आकांक्षा मेश्राम
७७.४० टक्के

यंदाच्या शैक्षणिक वर्ष २०२५.२६ मध्ये ओजस धनंजय नाकाडे याने ९१.४० टक्के गुण मिळवून शाळेतून प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. तर द्वितीय क्रमांक हरीश दडमल (८४.४० टक्के), तृतीय क्रमांक यश राजेंद्र सहारे (८०.२० टक्के), चतुर्थ क्रमांक श्रेया ओमकार वासनीक (७९ टक्के), तर पाचवा क्रमांक आकांशा शशीकांत मेश्राम (७७.४० टक्के) यांनी प्राप्त केला आहे. यावर्षी शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयात उत्कृष्टरित्या प्राविण्य प्राप्त केले.

विद्यार्थ्यांच्या या घवघवित यशाबद्दल नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष स्नेहलताताई भैया, सचिव अशोक भैया, सदस्य गौरव भैया, स्कुलच्या संचालिका अशिता भैया, प्राचार्य कादिर कुरेशी यांनी सर्व गुणवंताचे अभिनंदन केले असून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. उपप्राचार्य राठी मॅम, पर्यवेक्षिका झोडे मॅम आणि संपुर्ण शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय शिक्षक आणि पालकांना दिले आहे.

## महर्षी वाल्मिकी बचत गटातर्फे
### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

ब्रम्हपुरी/का.प्र.

नुकत्याच जाहीर झालेल्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेच्या निकालात ब्रम्हपुरी येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या यशाची दखल घेत स्थानिक महर्षी वाल्मिकी बचत गटाच्या वतीने गुणवंत विद्यार्थी ओमकार प्रमोदजी दिघोरे आणि रिया नत्थुजी चांदेकर यांचा त्यांच्या निवासस्थानी जाऊन सहकुटुंब सत्कार करण्यात आला.



८६.६०% गुणांसह उत्तीर्ण स्थानिक ख्रिस्तानंद इंग्रजी शाळेचा विद्यार्थी ओमकार दिघोरे याने दहावीच्या परीक्षेत ८६.६०% गुण मिळवून 'प्रविण्य श्रेणी'त यश संपादन केले. तसेच, बारावीच्या परीक्षेत नेवजाबाई हितकरणी महाविद्यालयाची विद्यार्थिनी रिया नत्थुजी चांदेकर हिने बारावी विज्ञान मध्ये ७१.८३% गुण मिळवून यश संपादन केले.

या दोन्ही गुणवंतांच्या कौतुकासाठी महर्षी वाल्मिकी बचत गटाचे सदस्य आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी हरीश कामडी, अनिल पचारे, अमोल भानारकर, प्रभुजी वाघधरे, आनंद शिवुरकर, संदिप भानारकर, गिरीधर सिंदीमेश्राम, नत्थुजी चांदेकर आदींनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## दिलेले आश्वासन पुर्ण न केल्यास ओबीसी समाज रस्त्यावर उतरले

**- प्रा. प्रकाश बगमारे**

ब्रम्हपुरी/का.प्र.

अनेक आंदोलनानंतर केंद्र सरकारने संसदेमध्ये ओबीसींची स्वतंत्र नोंद घेण्यात येईल, असे आश्वासन दिले. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी तशी घोषणा केली. यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघ आणि काँग्रेस आणि भाजपातील तसेच अनेक पक्ष संघटनातील ओबीसी कार्यकर्त्यांनी जनगणना करताना जातीनिहाय ओबीसीची जनगणना करण्यात यावी अशी प्रचंड मागणी देशभर केली आणि याचाच परिपाक म्हणून केंद्र सरकारला निर्णय घेऊन आश्वासन द्यावे लागले. परंतु जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्या मोजणी दरम्यान ओबीसी साठी स्वतंत्र रकाना असेल असे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभेच्या मागील अधिवेशनात आश्वासन दिले असून ते पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे .मात्र हे आश्वासन पूर्ण झाले नाही तर ओबीसी समाजाला रस्त्यावर उतरण्याशिवाय पर्याय नाही असे मत ओबीसी नेते प्रा प्रकाश बगमारे यांनी व्यक्त केले आहे.

केंद्र सरकारने ३० एप्रिल २०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत ओबीसींची जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय जाहीर केला होता. १६ मे २०२६ पासून जनगणनेचा पहिला टप्पा घरगणना स्वरूपात होणार आहे. मात्र जनगणना आयुक्त कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या ३३ प्रश्नांच्या प्रश्नावली मध्ये अनुसूचित जाती व जमातीसाठी स्पष्ट उल्लेख करण्यात आला असला तरी ओबीसीसाठी स्वतंत्र रकाना नसून 'अन्य' असा उल्लेख करण्यात आल्याने ओबीसी समाजात तीव्र नाराजी आणि संभ्रम निर्माण झाला आहे अशी भावना ओबीसी नेते प्रा. प्रकाश बगमारे यांनी व्यक्त केली आहे.

# नियमबाह्य टिल्लूपंप लावून पाणी खेचणाऱ्यांचे एकूण २८ पंप जप्त!

## ब्रम्हपुरी नगर पालिकेची धडक कारवाई

ब्रह्मपुरी/का.प्र.

उन्हाळ्याच्या दिवसांत शहरात पाण्याची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या आणि नळ जोडणीला बेकायदेशीरपणे टिल्लूपंप (मोटार) लावून पाणी खेचणाऱ्या नागरिकांविरोधात ब्रह्मपुरी नगर परिषदेने अत्यंत आक्रमक पाऊल उचलले आहे. मुख्याधिकारी डॉ. माधुरी सलामे यांच्या आदेशानुसार गठीत करण्यात आलेल्या विशेष पथकाने शहरातील विविध प्रभाग आणि वॉर्डांमध्ये धडक मोहीम राबवून आतापर्यंत एकूण २८ बेकायदेशीर टिल्लूपंप जप्त केले आहेत. पालिकेच्या या कारवाईमुळे नियमबाह्यपणे पाणी खेचणाऱ्या नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

शहरातील काही नागरिक आपल्या नळांना बेकायदेशीरपणे टिल्लूपंप लावून मोठ्या प्रमाणावर पाणी खेचत असल्याच्या तक्रारी नगर परिषदेकडे प्राप्त झाल्या होत्या. या कृत्यामुळे जलवाहिन्यांमधील पाण्याचा दाब (प्रेशर) कमालीचा कमी होत असून, प्रामाणिकपणे कर भरणाऱ्या इतर सर्वसामान्य नागरिकांना योग्य प्रमाणात पाणी मिळत नव्हते. शहरात यामुळे



मोठी कृत्रिम पाणीटंचाई निर्माण झाली होती. या समस्येची गंभीर दखल घेत मुख्याधिकारी डॉ. माधुरी सलामे यांनी ३० एप्रिल २०२६ रोजी एका विशेष आदेशान्वये 'टिल्लूपंप जप्ती पथकाची' स्थापना केली.

शहरात आतापर्यंत तीन मोठ्या कारवाया करण्यात आल्या आहेत. यात दिनांक ०५ मे २०२६ रोजी आंबेडकर वॉर्ड आणि बालाजी वॉर्डातून ०६ टिल्लूपंप जप्त करण्यात आले. तसेच दिनांक ०६ मे २०२६ भवानी वॉर्डात धडक मोहीम राबवून ०८ टिल्लूपंप जप्त केले. आणि दिनांक १६ मे २०२६ भवानी वॉर्ड आणि बालाजी वॉर्डात पुन्हा मोठी कारवाई करत १४ टिल्लूपंप नगरपरिषद प्रशासनाने जप्त केले आहेत.

ही धडक कारवाई नगर परिषदेचे पाणी पुरवठा कनिष्ठ अभियंता मोहित ढोकणे, पाणीपुरवठा फिटर ललित काळे, शिपाई दुधराम बेदरे, यांच्यासह पालिकेचे पंपचालक, वालमन आणि इतर कंत्राटी कामगारांच्या उपस्थितीत पार पडली. तसेच पाणीपुरवठा विभागाचे वरिष्ठ लिपिक डी. एन. हटवार या मोहिमेवर लक्ष ठेवून आहेत. 'नागरिकांनी नळाला बेकायदेशीर मोटार लावू नये, अन्यथा पंप जप्तीसह कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल,' असे आवाहन नगर परिषद प्रशासनाने केले आहे.

## आगामी जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलमची मागणी

### ब्रम्हपुरी काँग्रेसच्या ओबीसी सेलचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

ब्रम्हपुरी/का.प्र.

देशात लवकरच होऊ घातलेल्या जनगणनेमध्ये इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजासाठी स्वतंत्र कॉलम प्रतिनिधित्वाचा अधिकार दिलेला असताना ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम न ठेवणे ही सामाजिक न्यायाच्या तत्त्वाला बाधा पोहोचविणारी बाब असल्याचे



समाविष्ट करण्यात यावा, अन्यथा अशा जनगणनेला तीव्र विरोध करण्यात येईल, असा इशारा काँग्रेस ओबीसी सेलच्या वतीने देण्यात आला आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, देशातील ओबीसी समाज हा मोठा सामाजिक घटक असूनही आजपर्यंत त्यांच्या अचूक लोकसंख्येची आधिकृत आकडेवारी शासनाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय योजनांचे योग्य नियोजन करण्यात अडचणी निर्माण होत आहेत. ओबीसी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र जनगणना आकडेवारी अत्यंत आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. तसेच भारताच्या संविधानाने सर्व समाजघटकांना समान न्याय व निवेदनात म्हटले आहे. भविष्यात आरक्षण, शासकीय योजना, निधी वाटप व विविध विकासकामांवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो, अशीही भूमिका काँग्रेस ओबीसी सेलने मांडली.

निवेदन देतांना काँग्रेस ओबीसी सेलचे अध्यक्ष राकेश पडोळे, काँग्रेस ओबीसी सेलचे कार्याध्यक्ष वामन मिसार, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष हितेंद्र राऊत, कृउबा सभापती प्रभाकर सेलोकर, नगराध्यक्ष योगेश मिसार, माजी जि.प.सदस्य डॉ.राजेश कांबळे, माजी जि.प.सदस्य प्रमोद चिमुरकर, प्रदेश काँग्रेस सचिव थानेश्वर कायरकर, युवक काँग्रेसचे अध्यक्ष सोनू नाकतोडे, युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष अनुकूल शेंडे, न.प.नियोजन सभापती सचिन राऊत, न.प.आरोग्य सभापती मनोज कावळे, नगरसेवक मोंटु पिलारे, नगरसेविका जयश्री कुथे, नगरसेविका रंजना बुराडे, नगरसेविका रेणू ठेंगरी, नगरसेविका ज्योती राऊत, कृउबा संचालक अरुण अलोने, तालुका काँग्रेस कमिटी चिमुर विधानसभा अध्यक्ष नेताजी मेश्राम, जिल्हा काँग्रेस सचिव वासुभाऊ सोंदरकर, नगरसेवक पुष्पाकर बांगरे, नगरसेवक वकार खान, उपसरपंच गुरूदेव वाघरे, दलितमित्र प्रा.डी.के.मेश्राम, मुन्ना रामटेके, जिल्हा काँग्रेस सहसचिव गाजी पटेल, माजी नगरसेवक जगदीश आमले, चौगान येथील सरपंच उमेश धोटे, अतुल राऊत, शहर काँग्रेस उपाध्यक्ष सुनिल विखार, शहर काँग्रेस सहसचिव सोमेश्वर उपासे, संदीप बगमारे, युवक काँग्रेसचे प्रिन्स नंदुरकर, डेनी शेंडे, मोहसीन कुरेशी, गिरीश बुराडे, राहुल ठेंगरी, कमलेश मुळे, मुकुंदा राऊत, नेताजी पीसे, विलास दाणी, निखील करंबे, चक्रेश करंबे, सुखदेव खेत्रे, मोहन वैद्य, प्रशांत बावणे, सुधीर पडोळे, चंदू कावळे, गणेश काटवे, विवेक राऊत, भाऊराव बांगरे, दिनेश नाकाडे, अमीताभ नागमोती, खुशाल गजपुरे, हेमंत मस्के यांसह मोठ्या संख्येने काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**वाचाल तर वाचाल..**

## अवैध दारूसह लाखोंचा मुद्देमाल जप्त

ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक १८/०५/२०२६ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास गांगलवाडी कडून एक स्विफ्ट डिझायर मध्ये विदेशी दारूच्या पेट्या विक्री करता आरमोरी येथे घेऊन जाणार असल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने, पोलीसांनी आरमोरी-गांगलवाडी रोडवरील खोब्रागडे महाविद्यालयाजवळ नाकाबंदी करून, सकाळी ११/०० वाजे सुमारास एक पांढऱ्या रंगाची स्विफ्ट डिझायर कंपनीची MH 05 FZ 5092 गाडी थांबवून गाडीची झडती घेतली असता गाडीमध्ये १,९२,००० रुपये किमतीचे एकूण १६ कागदी खोक्यामध्ये प्रत्येकी खोक्यामध्ये १८० एम एल मापाच्या एकूण ४८ काचेच्या रॉयल स्टॅग कंपनीची विदेशी दारू असलेले बाटल्या अशा एकूण १६ कागदी खोक्यामध्ये ७८० नग मिळून आल्याने स्विफ्ट डिझायर चालक कुणाल अरुण भगत वय २५ वर्ष रा. पेठवॉर्ड ब्रह्मपुरी याचे कडून ४,००,०००/- रुपये किमतीची स्विफ्ट डिझायर व १,९२,०००/- रुपये किमतीची विदेशी दारू असा एकूण ५,९२,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सदर वाहन चालक आरोपी व दारूची मालकी असलेले आरोपी गोकुळ महाजन वय ४५ वर्ष दोन्ही रा. ब्रह्मपुरी यांच्या विरुद्ध ब्रह्मपुरी पोलीस स्टेशनला अप.क्रमांक ४७६/२०२६ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(अ),८३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर कारवाई ठाणेदार प्रमोद बानबले यांचे मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज खडसे यांचे नेतृत्वामध्ये ब्रम्हपुरी पोलीसांनी केलेली आहे.

**... QUOTES ...**

"Education is the most powerful weapon which you can use to change the world."
- Nelson Mandela

**चारोळी**

बायको खुश राहावी नेहमी म्हणून
तो न केलेल्या चुकाही कबूल करतो...
पुढे-पुढे दोघांनाही तशी सवय लागते,
तिला मुलं होतं, हा बाप झाल्याचे कबूल करतो...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# स्व. मदनगोपालजी भैया यांची पुण्यतिथी साजरी




ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालूक्यातील भटक्या, विमुक्त, मागास, आदिवासी आणि वंचित घटकांचा शिक्षणाच्या माध्यमातून सर्वांगीन विकास व्हावा म्हणून शिक्षणाची ज्ञानगंगा त्यांच्यापर्यंत पोहचविण्यासाठी कर्मयोगी ब्रम्हलीन संस्थापक स्वर्गीय मदनगोपालजी भैया यांनी नेवजाबाई हितकारिणी शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे निस्सती गुरूदेव भक्त कर्मयोगी स्व. मदनगोपालजी भैया यांच्या पुण्यतिथी निमित्य स्थानिक एल. एम. बी. पब्लिक स्कुल ब्रम्हपुरी येथे दि. १ मे २०२६ शुकवारला सायंकाळी ६. वाजता स्कुलच्या प्रांगणात कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी भजन व काल्याचे आयोजन करण्यात आले.

स्व. मदनगोपालजी भैया यांचा जन्म १० ऑक्टोंबर १९०६ ला भंडारा जिल्हयातील लाखांदूर येथे सर्वसाधारण परिवारात झाला. त्यांनी अनेक सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करून जनमानसात स्वत:ची ओळख निर्माण केली. त्यांनी नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचा पाया वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रेरणेतून रचला. त्यांनी निर्माण केलेल्या संस्थेच्या शैक्षणिक शाखा ब्रम्हपुरी शहरासंह इतरत्र विद्यादानाचे महान अविरतपणे आहेत. त्यांच्या चार पिढ्या पार पडुनही अजुनपर्यंत त्यांना हृदयात अविरतपणे जिवंत ठेवण्यात आले आहे. त्यांच्या आठवणी ने. हि. संस्थेच्या शिक्षणातून जागृतपणे दिसत आहेत आणि त्या आठवणी शिक्षणाच्या माध्यमातून सर्वांच्या हृदयात तेवत राहतील.

पुण्यतिथी कार्यक्रमाप्रसंगी ने. हि. शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष स्नेहलताताई भैया, सचिव अशोकजी भैया, सुनिताताई भैया मॅडम, गौरव भैया, एल.एम.बी. स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम व ने. हि. कॉलजचे प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर तथा कर्मचारी वर्ग तसेच ने. हि. मुला व मुलीच्या शाळेतील मुख्याध्यापक व कर्मचारी, शांताबाई भैया महाविद्यालयाचे प्राचार्य तथा कर्मचारी, ने. हि. उच्चमाध्यमिक शाळा नवेगाव पांडव येथील शिक्षक व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. सोबतच एल. एम. बी. स्कुलचे प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षिका तसेच कर्मचारी वर्ग, तसेच ने. हि. शाखेचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित होते.

# ब्रम्हपुरीच्या जेष्ठ नागरिकांचा धडक मोर्चा

ब्रम्हपुरी/का.प्र.

जेष्ट नागरीक संघटना ब्रम्हपुरी व सिटीझंस फोरम ब्रम्हपुरीच्या दि. २४ एप्रिल २०२६ ला झालेल्या त्रैमासीक सभेत ब्रम्हपुरीतील रस्त्याचे काम व भुतीनाल्यावरील पुलाचे काम अत्यंत संथ गतीने चालू असल्यामूळे जेष्ट नागरीक व सर्वसाधारण नागरीक अत्यंत त्रस्त झालेले आहे. या संबंधात उपविभागीय आधिकारी ब्रम्हपुरीकडे धडक मोर्चा नेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.



त्यानुसार ब्रम्हपुरीच्या उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. उपविभागीय अधिकाऱ्यांनी उपरोक्त कामाबद्दल त्यांनी पाठपुरावा केलेला असून १० मे २०२६ पर्यत रस्त्याचे काम पूर्ण करण्याची हमी ठेकेदारानी दिली आहे असे कळविले. हे दोन्ही काम १५ जून पर्यत पूर्ण करण्यात यावे, अन्यथा तिव्र आंदोलना शिवाय पर्याय राहणार नाही असेही सुचित करण्यात आले. भुतीनाला पुला करीता शासनाकडून वेळोवेळी फंड उपलब्ध होत नसल्यामूळे पुलाचे काम रखडलेले आहे. या बाबतीत मान. खासदार व आमदार यांना विनंती करण्याचे निर्णय घेण्यात आले. सदर पाठपुराव्याबद्दल एसडीओंचे आभार व्यक्त केले.

या धडक मोर्चात प्रा. सुभाष बजाज अध्यक्ष, हरिश्चंद्र चोले, कार्यकारी अध्यक्ष नारायण बोकडे, उपाध्यक्ष राजेंद्र हेमके, सचिव प्रा. मंजुषा बजाज, भालचंद्र नाकाडे, शंकर लांजेवार, प्रा. अनिल कोडापे, प्रा. शंकरराव केळझरकर, प्रा.आर.बी. मेश्राम, नगरसेवक पुष्पांकर बांगरे, वामनराव कोहाडकर, राजेंद्र महाजन, मोरेश्वर फाळके, मुकुंद पाठक, श्रीधर ढोंगे उपस्थित होते.

Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.



प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.





# जि.प. सदस्यांविनाच होणार विधान परिषद निवडणूक

ब्रम्हपुरी/का.प्र.

आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याने राज्यातील २० जिल्हा परिषदेच्या निवडणुका लांबणीवर टाकण्यात आल्या असतानाही आणि जिल्हा परिषदेचे सदस्य हे मतदार असताना विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार संघातील निवडणुका जाहीर करण्यात आल्याने जिल्हा परिषदेचे भावी सदस्य या निवडणुकीला मुकणार आहेत.

केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडणूक द्यायच्या विधान परिषदेच्या १६ जागांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला. या निवडणुकांमध्ये महापालिका, नगरपालिका, नगर पंचायतींसोबत जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापती हे मतदार असतात. परंतु विदर्भातील भंडारा व गोंदिया जिल्हा परिषद वगळता इतर जिल्हा परिषदांमध्ये प्रशासक आहेत.

आरक्षणाची टक्केवारी ५० टक्क्यांवर गेल्याने व प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने राज्य निवडणूक आयोगाने, काही महिन्यांपूर्वी महापालिका, नगर पालिका व नगर पंचायतींच्या जिल्हा परिषदांच्या निवडणुका निवडणुका घेतल्या. परंतु २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका रोखल्या होत्या. तेथे न्यायालयाच्या निकालानंतर निवडणुका घेण्याची भूमिका सरकार व आयोगाने घेतली आहे. असे असताना दुसरीकडे केंद्रीय निवडणूक आयोगाने विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला. यासाठी आयोगाने ज्या ठिकाणी निवडणुका होत आहेत तेथील ७५ टक्के स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात असण्याचा मुद्दा जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या पुढे केला आहे. परंतु दुसरीकडे निवडणुकाच न झाल्याने मतदार असलेले जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापती या निवडणुकांमध्ये मतदानापासून वंचित राहणार आहेत.

झाडे लावा, झाडे जगवा...

Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404